कोर्ट

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** जत
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0338 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 11/06/2026 00:02

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 10/06/2026
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 10/06/2026
**Time From (वेळेपासून):** 15:08 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:28 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 10/06/2026 **Time (वेळ):** 23:47 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 030
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 10/06/2026 23:47 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** जत नगरपरीषदेखालील असलेल्या, यशोदा फोटो स्टुडीओमध्ये

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्रीमती यास्मीन इनामदार

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस उप अधीक्षक,अन्टी करप्शन ब्युरो, सांगली,जत,सांगली,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस उप अधीक्षक,अन्टी करप्शन ब्युरो, सांगली,जत,सांगली,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** -

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9527904700

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रविण रंगराव बाबर | | | 1. जत नगरपरीष,राश्री इथापे याचे घरी भाडयान,भोसले अपार्टमेंट, 3 रा मजला,बालविदयामंदीराचे पाठीमागील बाज,जत मुळ रामुपोकामेरी तावाळव,जत, सांगली,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

वर्दी जबाब दि. 10.06.2026

मी श्रीमती यास्मीन इनामदार, वय - 40 वर्षे, व्यवसाय - नोकरी, पोलीस उप अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली, मो.न. 9527904700.

सरकारतर्फे फिर्यादी होवून देते फिर्यादी जबाब की, मी पोलीस उप अधीक्षक या पदावर अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली येथे कार्यरत आहे.

दि. 09/06/2026 रोजी तक्रारदार श्री. बाबासाहेब तातोबा साबळे, रा. जत यांनी आम्हास संपर्क करून त्यांची जत नगरपरिषद येथील कार्यालयीन अधीक्षक श्री.बाबर यांचेविरूध्द लाच मागणीची तक्रार कळवून त्यांची तक्रार जत येथे येवून घेण्याची विनंती केली. त्यावेळी मी तक्रारदार यांना दि. 10/06/2026 रोजी सकाळी 11.00 वाजता पथकासह जत येथे येत असलेचे सांगून आलेनंतर संपर्क करीत असलेचे सुचना दिल्या.

त्यानंतर मी दि. 09/06/2026 रोजी मा. सह जिल्हा दुय्यम निबंधक वर्ग-1 सांगली यांना पत्रव्यवहार करून वर्ग-3 चे एक व वर्ग-4 चे एक कर्मचारी यांची पंच सेवा मिळणेबाबत विनंती करून दोन्ही पंचांचे संपर्क क्रमांक प्राप्त करून त्यांना दि.10/06/2026 रोजी सकाळी 09.30 वाजता एसीबी कार्यालयात हजर राहणेच्या सुचना दिल्या. दि.10/06/2026 रोजी मी दिले सुचनेप्रमाणे दोन्ही पंच सकाळी 09.30 वा चे सुमारास एसीबी कार्यालयात आमचे समक्ष हजर झाले. त्यांनी पंच साक्षीदार म्हणून काम करण्यास संमती दिली.

त्यानंतर मी, दोन्ही पंच, व ला.प्र.वि.पथक पडताळणी व सापळा कारवाईकामी लागणारे आवश्यक साहित्य सह शासकीय वाहन महिंद्रा बुलेरो न्युओ क्र. एमएच-10-ईव्ही-4685 मधून कार्यालयातून 09.45 वा चे सुमारास रवाना होवून स्टेशन चौक, माधवनगर, बुधगाव कुंमठेफाटा मार्गे, शिरढोण, नागज फाटा, जत येथे शासकीय बंद स्थितीत असलेले दुध शितकरण केंद्र चे पाठीमागील बाजूस सुरक्षित ठिकाणी 11.10 वा चे सुमारास दाखल झालो. त्यानंतर मी तक्रारदार साबळे यांना संपर्क करून आम्ही थांबलो त्याठिकाणी बोलवून घेतले. तक्रारदार श्री. साबळे हे त्यांचेकडील होंडा शाईन क्र. एमएच-10-सीझेड-6595 वरून आमचे समक्ष हजर झालेनंतर त्यांनी मी आमचेकडील वाहनात बसवले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. साबळे यांची दोन्ही पंचांची व सापळा पथकातील अंमलदार यांची एकमेकात ओळख करून दिली. त्यानंतर मी सदर कारवाईसाठी श्री. मोहन बाबासाहेब देसाई यांनी पंच नं. 1 म्हणुन व श्रीमती मनाली भिमराव वडर (भोसले) यांनी पंच नं.2 म्हणुन काम करण्याचे ठरवले.

त्यानंतर तक्रारदार श्री. साबळे यांनी त्यांची लाच मागणीची तक्रार पंचांसमक्ष थोडक्यात कथन केली. त्यामध्ये तक्रारदार यांचे जत नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुक 2025 चे फोटो व व्हिडीओ शुटींगचे केले कामाचे बिल काढलेचे मोबदला म्हणून तक्रारदार यांचेकडे 75,000/- रूपये लाचेची मागणी केली असलेबाबत हकीकत सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. साबळे यांना ब्युरोच्या कार्यप्रणालीबाबत माहिती देवून त्यांना त्यांचा तक्रारी अर्ज देण्याबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. साबळे यांनी त्यांचा हस्तलिखीत लाच मागणीचा तक्रारी अर्ज आमचे समक्ष हजर केला. त्यावेळी मी सदर तक्रारी अर्जावर सही केली. त्यानंतर मी तक्रारदार श्री. साबळे यांचा तक्रारी अर्ज दोन्ही पंचाना वाचण्यास दिला. दोन्ही पंचांनी तक्रारी अर्ज वाचून तक्रारदार यांनी तोंडी सांगीतलेली तक्रार व तक्रारी अर्जामधील मजकूर एकच असल्याचे असल्याची खात्री करून तक्रारी अर्जावर दोन्ही पंचांनी सह्या केल्या.

त्यानंतर तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करुन लोकसेवक श्री. बाबर यांचेविरूध्द लाचलुचपतीची सापळा कारवाई करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर मी तक्रारदार व दोन्ही पंचांना कार्यालयाकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली. त्यामध्ये नविन एक मेमरीकार्ड घालून मेमरीकार्ड मध्ये पुर्वीचे संभाषण नसल्याचे खात्री करून दिली. त्यानंतर मी तक्रारदार श्री. साबळे व पंच क्र.1 मोहन देसाई यांना पडताळणी कारवाईकामी योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर मी 11.37 वाजता माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे पडताळणी कारवाई वेळचे निवेदन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये तसेच सोनी हॅन्डीकॅममध्ये रेकॉर्ड केले. त्यानंतर मी तक्रारदार व पंच नं.1 यांना दिले सुचनांची उजळणी करून दिली.

त्यानंतर मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 11.56 वा सुरु करुन तो तक्रारदार यांना त्यांचे गळयामध्ये लेसच्या सहाय्याने अडकवून त्यांना लोकसेवक बाबर यांची जत नगरपरिषद येथे भेट घेण्यास रवाना केले. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. साबळे हे त्यांचेकडील होंडा शाईन क्र. एमएच-10-सीझेड-6595 वरून पंच नं.1 देसाई यांचेसह रवाना झाले.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री. साबळे व पंच नं.1 देसाई असे आमचे समक्ष हजर झाले. त्यावेळी मी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून तो मी 12.33 वाजता बंद करून माझे ताबेत घेतला.

त्यानंतर मी, पंच नं 1 श्री. देसाई यांना, लोकसेवक श्री. बाबर यांची भेट झाली का? तक्रारदार व त्यांच्या मध्ये काय संभाषण झाले ? असे विचारता, पंच नं 1 यांनी हकीगत सांगीतली की, " आपण दिले सुचनेप्रमाणे मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचेकडील मो.सा वरून रवाना होवून जत शहरातील जत नगरपरिषद येथे दाखल झालो. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांची मो.सा. रोडला पार्क करून आम्ही पहिल्या मजल्यावरील जत नगरपरिषदचे कार्यालयामध्ये दाखल गेलो. त्यावेळी तक्रादार श्री.साबळे यांनी कार्यालयातील एका कर्मचारी यांचेजवळ जावून "बाबर साहेब नमस्ते" असे म्हणून त्यांची भेट घेतली. त्यावेळी सदरचे इसम लोकसेवक बाबर असल्याची माझी खात्री झाली. त्यावेळी बाबर यांनी तक्रारदार यांना हाताने इशारा करून कार्यालयाचे टेरेसवर जाणेचे इशारा केला व तक्रारदार व बाबर हे कार्यालयाचे बाहेर येवून नगरपरिषद इमारतीचे टेरेसवर बोलत गेले. लागलीच मी देखील त्यांचे पाठोपाठ गेलो. व थोडया अंतरावर थांबून त्यांचे बोलणे ऐकू लागलो.

त्यावेळी तक्रारदार व बाबर हे टेरेसवर तक्रारदार यांचे प्रलंबित बिला संदर्भात चर्चा करू लागले. त्यावेळी लोकसेवक बाबर यांनी तक्रारदार यांना त्यांचे मंजूर केले बिलाचे " सत्तर हजार का पंचाहत्तर हजार हाय तर............ मी काय हिशोब केला नाही...... मागे पुढे काय तर होतील........ पंच्याहत्तर म्हणजे एक्झॅक्ट पंच्याहत्तर न्हायत.... म्हणजे माग पुढ काय तर होईल पाच हजार हिकड होतील किंवा पाच हजार तिकड होतील हिशोब " असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी त्यांना "एक टाक अवघड होत्यात" असे म्हणाले. त्यावर लोकसेवक बाबर यांनी " आता किती दयाच तेवढ दया ओ तुम्ही तुम्हाला किती अॅडजेस्ट होत्यात पन्नास होत असतील तर पन्नास दया ... मी अस न्हाय तुम्हाला म्हणत एक लाख दया." असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी " पन्नास हजार " असे म्हणाले असता बाबर यांनी "हा" असे म्हणून तक्रारदार यांचेकडे 50,000/- रूपये लाचेची मागणी केली. त्यानंतर तक्रारदार यांनी "एक तासाभरात येतो" असे म्हणाले असता बाबर यांनी "बर या या" असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार व मी असे जत नगरपरिषद येथून रवाना होवून आपणासमक्ष हजर झालो. लोकसेवक बाबर यांनी तक्रारदार यांचेकडे माझे समक्ष लाच मागणी केली आहे. मी थोडया अंतरावर थांबून त्यांचे हावभाव व इशारे पाहून व त्यांचे बोलणे ऐकले आहे." वगैरे हकीकत पंच नं.1 देसाई यांनी सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. साबळे यांना पडताळणीची हकीकत विचारली असता तक्रारदार यांनी लोकसेवक श्री. बाबर यांनी माझ्याकडे लाच मागणी केली त्यावेळी पंच क्र.1 देसाई हे ऐकू येईल इतक्या अंतरावर हजर होते व त्यांनी आमचेतील बोलणे ऐकले व पाहिले आहे अशी हकीकत सांगितली.

त्यानंतर आम्ही डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील पडताळणीचे वेळी तक्रारदार श्री. साबळे व लोकसेवक श्री.बाबर यांचे संभाषणातील ध्वनीमुद्रीत झालेली फाईल क्रमांक आरईसी 002 ही ध्वनीमुद्रीत झाली असल्याची व त्यामध्ये वरील प्रमाणे संभाषण झाल्याचे मी, तक्रारदार व दोन्ही पंचानी मुद्देसुद ऐकून खात्री केली.

पडताळणी कारवाईमध्ये, लोकसेवक श्री. बाबर, कार्यालय अधीक्षक, जत नगरपरिषद यांनी तक्रारदार यांचे जत नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुक 2025 चे फोटो व व्हिडीओ शुटींगचे केले कामाचे बिल काढून दिल्याचे मोबदल्यात तक्रारदार यांचेकडे 75,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती 50,000/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आम्ही लोकसेवक श्री. बाबर यांचेविरूध्द सापळा कारवाई आयोजित करण्याचे सर्वानुमते निश्चित केले. त्यानंतर मी तक्रारदार श्री. साबळे यांना लोकसेवक श्री. बाबर यांनी मागणी केलेली 50,000/- रूपये हजर

करण्यास सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचेकडे 30,000/- रूपये इतकी रक्कम उपलब्ध झाली असल्याचे सांगून 500/- रूपये दराच्या 60 नोटा असे एकुण 30,000/- रूपये आमचे व दोन्ही पंचांसमक्ष हजर केले. त्यावेळी आम्ही उर्वरित 20,000/- रूपये कार्यालयाकडील डमी नोटा वापरण्याचे निश्चित केले व डमी नोटांचे 500/- रूपये दराच्या 40 नोटा असे 20,000/- रूपये आम्ही पंचांसमक्ष हजर केले.

त्यानंतर मी सापळा पथकातील अंमलदार यांचेकरवी तक्रारदार यांनी हजर केलेली 30,000/- रूपये रक्कमेच्या नोटांचे नंबर एका को-या कागदावर लिहून घेतले. त्यावर मी, दोन्ही पंच व तक्रारदार यांनी सहया केल्या.

त्यानंतर मी तक्रारदार व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, अँथ्रासिन पावडरचा गुणधर्म, अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहिती देवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली.

त्यानंतर मी तक्रारदार यांनी हजर केलेल्या व कार्यालयाकडील डमी नोटांना पथकातील अंमलदार पोकॉ/जाधव यांचेकरवी अँथ्रासीन पावडर लावुन सदर नोटांचा बंडल पोकॉ/जाधव यांनी तक्रारदार यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिश्यामध्ये लोकसेवक श्री.बाबर यांनी मागणी केल्यानंतर त्यांना देणेसाठी ठेवली व आम्ही सापळापुर्व कारवाई पुर्ण केली.

त्यानंतर मी, तक्रारदार व दोन्ही पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्यामधील पडताळणी कारवाई वेळचे मेमरीकार्ड काढून माझे ताबेत घेवून त्यामध्ये एक नविन मेमरीकार्ड घातले.

त्यावेळी तक्रारदार श्री. साबळे यांनी त्यांचे मोबाईलवर लोकसेवक श्री. बाबर यांचा 13.47 वा चे सुमारास फोन येवून गेला असल्याची हकीकत सांगितली.

त्यावेळी आम्ही तक्रादार यांचे मोबाईलवरून लोकसेवक श्री. बाबर यांना फोन करून त्यांचेतील संभाषण ध्वनीमुद्रीत करण्याचे निश्चित केले. त्यानंतर मी दिले सुचनेप्रमाणे तक्रारदार श्री. साबळे यांनी त्यांचे मो.क्र.9637208889 वरून लोकसेवक श्री. बाबर यांचे मो.क्र.9168367075 यावर 13.51 वा चे सुमारास फोन करून फोन स्पिकर मोडवर घेतला. लागलीच मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 13.51 वाजता सुरू करून तक्रारदार यांचेसमोर धरला. त्यावेळी तक्रारदार यांनी लोकसेवक बाबर यांना रक्कमेची जुळणी करीत असल्याचे सांगितले. त्यावर बाबर यांनी तक्रारदार यांना जेवण करून आलेनंतर दुपारी 03.00 वाजता फोन करीत असल्याचे सांगून फोन कट केला. लागलीच मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केला.

त्यानंतर आम्ही सर्वानुमते दुपारी 15.00 वा नंतर लोकसेवक श्री. बाबर यांचा तक्रारदार यांना फोन आलेनंतर त्यांचेविरूध्द सापळा कारवाई करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर मी 14.15 वाजता सापळा कारवाईचे माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे निवेदन डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये व सोनी हॅन्डीकॅममध्ये रेकॉर्ड केले आहे.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. साबळे, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. तसेच पथकातील अंमलदार जाधव यांना जत येथील शासकीय बंद स्थितीत असलेले दुध शितकरण केंद्र येथे थांबणेचे सुचना देवून त्यांना सापळा कारवाईतून वगळण्यात आले. तसेच मी पथकातील अंमलदार पोकॉ/पाटील यांना त्यांचेकडील हॅन्डीकॅममध्ये लोकसेवक श्री. बाबर यांचेकडून लाच रक्कम जप्तीबाबत व्हिडीओ चित्रीकरण करणेबाबतच्या सुचना दिल्या.

तसेच मी तक्रारदार यांना लोकसेवक श्री. बाबर यांनी लाच रक्कम स्विकारलेनंतर हातरूमालाने तोंड पुसून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा इशारा करणेबाबतच्या सुचना
दिल्या.

त्यानंतर आम्ही 15.00 वा पर्यंत लोकसेवक श्री. बाबर यांचा तक्रारदार यांना फोन येण्याची वाट पाहिली परंतू लोकसेवक यांचा फोन न आलेनंतर आम्ही सर्वानुमते तक्रारदार श्री.साबळे व पंच नं.1 देसाई यांना लोकसेवक श्री. बाबर यांचेकडे जत नगरपरिषद येथे पाठवून सापळा कारवाई करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 15.08 वाजता सुरू करून तो तक्रारदार यांना त्यांचे गळयामध्ये अडकविणेच्या इशारा केला त्याप्रमाणे तक्रारदार श्री. साबळे यांनी रेकॉर्डरला असले लेसव्दारे तो गळयामध्ये अडकवून लोकसेवक श्री. बाबर यांची भेट घेण्याकरीता रवाना होणेबाबत इशारा केला. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. साबळे व पंच नं. 1 श्री. देसाई असे तक्रारदार यांचेकडील मो.सा वरून रवाना झाले. त्यांचे पाठोपाठ मी, पंच नं. 2 श्रीमती मनाली वडर (भोसले) व सापळा पथक असे आवश्यकत्या साहित्यासह शासकीय वाहन महिंद्रा बुलेरो न्युओ क्र. एमएच-10-ईव्ही-4685 मधून रवाना झालो. पोकॉ/जाधव हे बंद असले दुध शितकरण केंद्र जत येथे सुटकेससह थांबून राहिले.

त्यानंतर काही अंतर गेलेवर तक्रारदार यांनी त्यांचे मो.सा. थांबवून फोनवर बोलत असलेचे दिसले. त्यानंतर तक्रादार व पंच नं.1 असे जत विजापूर हायवे मार्गे जत शहरातून जत नगरपरिषद इमारतीचे खाली रोडकडेला मो.सा. पार्क

करून तक्रारदार व पंच नं.1 देसाई हे तक्रारदार यांचे यशोदा फोटो स्टुडीओमध्ये गेलेचे दिसले. लागलीच आम्ही व सापळा पथक असे जत नगरपरिषदचे काही अंतरावर आमचे वाहन पार्क करून वाहनामधून खाली उतरून आजुबाजूस सापळा लावून थांबून राहिलो.
त्यानंतर काही वेळाने एक अनोळखी इसम तक्रारदार यांचे फोटो स्टुडीओ मध्ये आतमध्ये गेले. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार यांनी स्टुडीओ च्या बाहेर येवून हातरुमालाने तोंड पुसून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजित इशारा केला.
लागलीच मी, पंच नं.2 व सापळा पथक असे तक्रारदार यांचे यशोदा फोटो स्टुडीओ मध्ये गेलो. त्यावेळी मी दिले सुचनेप्रमाणे पोकॉ/पाटील यांनी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 15.28 वा काढून घेवून बंद करून त्यांचे ताबेत घेतला व तक्रारदार यांना बाजूला जावून थांबण्या बाबत सुचना दिल्या.
त्यावेळी यशोदा फोटो स्टुडीओ मध्ये हजर असले पंच नं.1 देसाई यांनी स्टुडीओमधील अनोळखी इसम हे लोकसेवक श्री. बाबर असल्याचे सांगून त्यांनी तक्रारदार यांचेकडून लाच रक्कम स्विकारून त्यांचे पॅन्टचे समोरील डावे बाजुचे खिश्यामध्ये ठेवली व आपण आलेनंतर सदरची लाच रक्कम स्टुडीओमध्ये खाली टाकली असल्याची हकीकत सांगितली.
त्यानंतर मी दिले सुचनेप्रमाणे पोना/चौगुले यांनी लोकसेवक बाबर यांचा उजवा हात व पोकॉ/नायकुडे यांनी त्यांचा डावा हात मनगटाजवळ घट्ट पकडला.
त्यानंतर मी दिले सुचनेप्रमाणे पोशि/अजित पाटील यांनी त्यांचेजवळील हॅन्डीकॅममध्ये व्हीडीओ शुटींग सुरु केले. त्यावेळी मी लोकसेवक श्री. बाबर यांना माझी व सापळा पथकाची ओळख सांगितली. त्यानंतर मी दिले सुचनेप्रमाणे पंच नं.2 वडर (भोसले) यांनी लोकसेवक बाबर यांनी स्टुडीओ मध्ये खाली टाकलेला 500/- रूपये दराच्या नोटांचा बंडल उचलून पडताळणी केली असता सदर नोटांचे क्रमांक हे तक्रारदार यांनी सापळा कारवाईवेळी हजर केलेल्या नोटांचे क्रमांकाचेच असलेचे निष्पन्न झाले. सदर लाचेची रक्कम पंच नं 2 श्रीमती वडर (भोसले) यांना त्यांचेकडे ठेवण्यास सांगीतली त्याप्रमाणे त्यांनी त्यांचेकडे ठेवली. त्यानंतर आम्ही स्टुडीओ मध्ये जरूर तो अंधार करून अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात लोकसेवक श्री.बाबर यांचे हाताची तपासणी केली असता त्यांचे डावे हातास ठिक-ठिकाणी व पॅन्टचे समोरील डावे बाजुचे खिश्याचे कडास व आतील बाजूस अॅथ्रॉसिन पावडरची निळसर चकाकी दिसून आली. सदर कार्यवाहीचे पोकॉ/पाटील यांनी सलग त्यांचेकडील सोनी हॅन्डीकॅममध्ये व्हीडीओ चित्रीकरण केले आहे. त्यानंतर लाचेच्या सापळयातील प्राथमिक तपासण्या तक्रारदार यांचे यशोदा फोटो स्टुडीओ मध्ये पूर्ण केल्या आहेत.
त्यानंतर मी लोकसेवक श्री बाबर यांना त्यांचे पूर्ण नांव, वय, हुद्दा, पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्री. प्रविण रंगराव बाबर, वय - 32 वर्षे, व्यवसाय - कर निर्धारण व प्रशासकीय अधिकारी, वर्ग-3, रा. नदाफ मोहल्ला, भोसले अपार्टमेंट विग नं.3 जत, ता. जत, जि.सांगली असे असल्याचे सांगितले.
त्यानंतर आम्ही लोकसेवक बाबर यांना ताबेत घेवून जत नगरपरिषद कार्यालय येथे दाखल झालो. त्यावेळी लोकसेवक बाबर यांचे कार्यालयामधून तक्रारदार यांचे मंजूर बिलांची व प्रलंबित बिलांची फाईल व आवक रजिष्टर ताबेत घेतलीत.
त्यानंतर आम्ही लोकसेवक श्री. बाबर यांनी ताबेत घेवून जत नगरपरिषद येथून 16.10 वा चे सुमारास रवाना होवून शासकीय विश्रामगृह जत येथे 16.20 वा चे सुमारास दाखल झालो.
त्यानंतर मी पंच नं. 1 श्री. देसाई यांना सापळ्याची सविस्तर हकीकत सांगण्यास सांगितली असता पंच नं. 1 यांनी सापळ्याची हकीकत सांगितली की, “मी व तक्रारदार असे त्यांचेकडील मो.सा वरून रवाना झालो. त्यावेळी लोकसेवक बाबर यांचा तक्रारदार यांना फोन आला असता तक्रारदार यांनी मो.सा. थांबवून फोन स्विकारून तो स्पिकर मोडवर घेतला. त्यावेळी बाबर यांनी ते ऑफीसला आले असल्याचे सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी त्यांना येत असल्याचे सांगून आलेनंतर फोन करीत असलेचे सांगून फोन कट केला. त्यानंतर तक्रारदार व मी असे तेथून रवाना होवून जत नगरपरिषद येथे दाखल होवून तक्रारदार यांचे यशोदा फोटो स्टुडीओ मध्ये दाखल झालो. त्यावेळी तक्रारदार यांनी लोकसेवक बाबर यांना फोन करून फोटो स्टुडीओमध्ये आलो असल्याचे सांगून स्टुडीओ मध्ये येणेची विनंती केली असता बाबर यांनी ते खाली येत असल्याचे सांगितले.
त्यानंतर काही वेळाने लोकसेवक बाबर हे तक्रारदार यांचे यशोदा फोटो स्टुडीओ मध्ये आले व तक्रारदार यांचेशी चर्चा करू लागले. त्यावेळी लोकसेवक बाबर यांनी त्याचे उजवे हाताचा अंगठा त्यांचे तर्जणीवर घासून पैशाबाबत विचारणा केली असता, तक्रारदार साबळे यांनी त्यांचे पॅन्टचे उजवे खिश्यातील लाच रक्कम त्यांचे उजवे हाताने बाहेर करून लोकसेवक बाबर यांचेसमोर धरून “तुमी पन्नास सांगितल हुता..... पन्नास आणल्यात, मोजुन घ्या” असे म्हणाले. त्यावर लोकसेवक बाबर यांनी “मोजत बसाय नाय, राहु दे, एवढ कांय नाय” असे म्हणून लाच रक्कम

त्यांचे डावे हाताने स्विकारून त्याचे पॅन्टचे समोरील डावे बाजूचे खिश्यामध्ये ठेवली. त्यानंतर तक्रारदार यांनी बाबर यांना त्यांचे प्रलंबित बिल लवकर बिल मंजूर करणेची विनंती केली असता बाबर यांनी बिल काढत असल्याचे सांगितले. त्यानंतर तक्रारदार श्री. साबळे यांनी फोटो स्टुडीओचे बाहेर येवून हात रूमालाने तोंड पूसून लाच रक्कम स्विकारले बाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी आपण व सापळा पथक असे तक्रारदार यांचेजवळ आलात. त्यावेळी मी स्टुडीओ मधील इसम हे लोकसेवक बाबर असल्याचे सांगून त्यांनी तक्रारदार यांचेकडून लाच रक्कम स्विकारून त्यांचे पॅन्टचे डावे बाजुचे खिश्यामध्ये ठेवली व आपण आलेनंतर लोकसेवक बाबर यांनी लाच रक्कमेचा बंडल स्टुडीओमध्ये खाली टाकून दिला" वगैरे हकीकत पंच नं.1 यांनी सांगितली.
त्यानंतर मी तक्रारदार श्री. साबळे यांना सापळा कारवाईची हकीकत विचारली असता त्यांनी "लोकसेवक बाबर यांनी लाच रक्कम स्विकारताना पंच नं.1 देसाई हे समक्ष फोटो स्टुडीओ मध्ये हजर होतो व त्यांनी सर्व ऐकले व पाहिले आहे अशी हकीकत सांगितली. त्यानंतर पुढील कार्यवाही शासकीय विश्रामगृह जत येथे पुर्ण करण्यात आली आहे.

तरी दि. 10/06/2026 रोजीचे पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. प्रविण बाबर यांनी जत नगरपरिषद येथे आपले स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून भ्रष्ट व गैरमार्गाने स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता तक्रारदार यांचे जत नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुक 2025 चे फोटो व व्हिडीओ शुटींगचे केले कामाचे बिल अदा करून दिलेचा मोबदला म्हणून तक्रारदार यांचेकडे 75,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती 50,000/- रूपये लाचेची मागणी केली. व त्यानंतर लागलीच केले सापळा कारवाई वेळी लोकसेवक श्री. प्रविण बाबर यांनी तक्रारदार यांचे यशोदा फोटो स्टुडीओ मध्ये आपले स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून भ्रष्ट व गैरमार्गाने स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता तक्रारदार यांचेकडून 50,000/- रूपये लाच रक्कम स्विकारून स्वत:चा आर्थिक फायदा मिळविला आहे. म्हणुन माझी लोकसेवक श्री. प्रविण रंगराव बाबर, वय - 32 वर्षे, व्यवसाय - कर निर्धारण व प्रशासकीय अधिकारी, वर्ग-3, जत नगरपरिषद रा. नदाफ मोहल्ला, भोसले अपार्टमेंट विग नं.3 जत, ता. जत, जि.सांगली यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा 1988 (सुधारणा 2018) चे कलम 7 प्रमाणे सरकारतर्फे फिर्याद आहे.
माझा वरील फिर्यादी जबाब मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो पिं्रट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा दिला वर्दीजबाब,

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SANDEEP RANGRAO KOLEKAR(I (Inspector)) / PNMH53637 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नांव):** SANDEEP RANGRAC
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PNMH53637

ठाणे अंमलदार
जत पोलीस ठाणे

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**